# विक्रीची जाहीर नोटीस

स्थावर मिळकत विक्रीची जाहीर नोटीस सरफेसी कायदा २००२ चे नियम ८ पोटनियम (६)नुसार तमाम सर्वसाधारण जनतेस तसेच कर्जदार/मिळकतदारास नोटीस देतो की, बँकेकडे तारण असलेली मिळकत आपण स्वेच्छेने **दि.०९/१२/२०१९** रोजी बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात दिली आहे व त्याप्रमाणे खालील नमुद कर्जाची येणेबाकी रक्कम + पुढील व्याजाची वसुली नमुद कर्जदार यांच्याकडून करण्यासाठी दि. **१३/०३/२०२०** रोजी लिलाव लावण्यात येणार आहे.बँकेने खालील वर्णनाची स्थावर मिळकत तदंगभुत वस्तुंसह "**जशी आहे तशी**"व "**जिथे आहे तिथे** "या तत्वावर विक्री करण्यासाठी तमाम जनतेकडून मोहोरबंद निवीदा मागवत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

<table>
<tr><td colspan="2">कर्जदार/तारण ठेवणाऱ्या व्यक्तीचे नावः-श्री.प्रकाश तोताराम नेरकर</td></tr>
<tr><td colspan="2">स्थावर मिळकतीचे वर्णनः-खालील वर्णनाची मिळकत त्यावरील या पूर्वीचे व या नंतरचे बांधकाम व तदंगभूत वस्तुंसह ः-अ.क्र. १) जळगाव महानगर पालीका हद्दीतील सी टी.एस. नं. ८१अ, बांधीव क्षेत्र ७१.१० चौ.मी.मिळकतीच्या चतुःसिमाः-पुर्वेस -रोड ; पश्चिमेस-सी टी.एस. नं. ८३ ; दक्षिणेस - सी टी.एस. नं. ८१ब ; उत्तरेस -सी टी.एस. नं. ८२ व ८३ अ<br><br>अ.क्र.२) जळगाव महानगर पालीका हद्दीतील सी टी.एस. नं. ८१ब, बांधीव क्षेत्र ७१.१० चौ.मी.मिळकतीच्या चतुःसिमाः-पुर्वेस -रोड ; पश्चिमेस-सी टी.एस. नं. ८३ ; दक्षिणेस -रोड ; उत्तरेस - सी टी.एस. नं. ८१अ</td></tr>
<tr><td>अ.क्र.१ व २ ची एकत्रित राखीव किंमतः-<br>रु.२,१०,६९,२८२/-(अक्षरी रुपये दोन कोटी दहा लाख एकोणसत्तर हजार दोनशे ब्याऐंशी मात्र)</td><td>अ.क्र.१ व २ ची एकत्रित अनामत रक्कम<br>रु.२१,०६,९२८/-(अक्षरी रुपये एकविस लाख सहा हजार नऊशे अठ्ठावीस मात्र)</td></tr>
<tr><td colspan="2">अनामत रक्कम व ती जमा करण्याची शेवटची तारीख/वेळ व कोणाकडे जमा करावयाची तो पत्ताः-<br>इच्छुक खरेदीदार मिळकतीसाठी निविदा दाखल करु शकतात व त्या अनुषंगाने वर निर्देशित केल्याप्रमाणे संबंधीत मिळकतीसाठीची अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.मिळकत खरेदीसाठी निवीदा बँकेच्या नावाचा धनाकर्ष (डी.डी.)जळगाव जनता सहकारी बँक लि.जळगाव या नावाने दि.१२/०३/२०२०, दुपारी ३ वाजेपर्यंत जळगाव जनता सहकारी बँक लि जळगांव,सेवा, ‘‘११७,११९, नवी पेठ, मुख्य कार्यालय जळगांव’’ येथे जमा करावी.</td></tr>
<tr><td colspan="2">बँकेस ज्ञात असलेले इतर बोजेः- नाही</td></tr>
<tr><td colspan="2">निवीदा उघडण्याची व लिलावाची तारीख/ठिकाण व वेळः-<br>निवीदा दि.१३/०३/२०२० दुपारी ३.०० वाजता जळगाव जनता सहकारी बँक लि जळगांव,सेवा, ‘‘११७,११९ नवी पेठ, मुख्य कार्यालय, जळगांव’’ येथे उघडण्यात येतिल.</td></tr>
<tr><td colspan="2">याच मिळकती तारण असलेल्या अन्य कर्जाच्या येणेबाकी रक्कमेचा तपशिलः-<br>१) होम लोन येणेबाकी रक्कम रु.४२,८७,३५१/- दि.३१/१२/२०१८ पर्यंत ,२) टर्म लोन येणेबाकी रक्कम रु.१,३०,६२,७३५/- दि.३१/१२/२०१८ पर्यंत,तसेच सदर मिळकत तारण ठेवून कर्जदारांनी घेतलेल्या अन्य कर्जाच्या येणेबाकी रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे रक्कम रु.१२,९७,३४५.९१ रु. २९,०६,४६९.३० व त्यावर दि.०१/१०/२०१९ पासुन व्याज व खर्च, असे एकुण येणेबाकी रक्कम रु.२,१५,५३,९०१.२१ + दि.०१/१०/२०१९ पासुन पुढील व्याजाच्या प्रभारास अधिन राहून असेल.</td></tr>
</table>

वर नमुद जि.जळगाव येथील मिळकतीचे अवलोकन **दि.११/०३/२०२०**रोजी कार्यालयीन वेळेत करता येईल.

वर नमुद मिळकत विकत घेण्याची ईच्छा असलेल्या व्यक्तींनी अधिक माहितीसाठी व निविदा फॉर्म घेणेसाठी वसुली विभाग प्रमुख श्री.ओंकार पाटील (मोबाईल नंबर-९९२३४२२२९२,९९२३४२२२५२) यांच्याशी सकाळी ११.०० ते सायं.४.००या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.बीड फॉर्म/ निवीदा फॉर्म बँकेच्या मुख्य कार्यालयात मिळतील.

मिळकत खरेदीसाठी निवीदा बँकेच्या नावाचा धनाकर्ष (डी.डी.) व स्वतःचे पॅन कार्डची व आधारकार्डची स्व साक्षांकीत प्रत यासह जमा करावी.मोहोरबंद पाकीटावर "**श्री.प्रकाश तोताराम नेरकर यांची मिळकत क्र.१ आणि क्र.२ विकत घेण्यासाठी निवीदा**" असे स्पष्टपणे नमुद करुन वरील पत्त्यावर सादर करावयाची आहे.

सदरची मोहोरबंद निवीदा **दि.१३/०३/२०२०** रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील व ज्या व्यक्तींनी निवीदा भरलेल्या आहेत त्या व्यक्तींनाच निवीदा उघडण्याच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येईल. सदरच्या निवीदा उघडल्यानंतरही ज्या व्यक्तींची निवीदा रकमेपेक्षा जास्त किमतीस सदरची मिळकत विकत घेण्याची ईच्छा असेल त्या व्यक्ती त्यांचा प्रस्ताव प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर ठेवू शकतात आणि हा प्रस्ताव आलेल्या निवीदांपेक्षा जास्त रकमेचा असेल तर हा प्रस्ताव विचारात घेतला जाईल.

राखीव किमती पर्यंत कुठलाही प्रस्ताव न आल्यास अथवा ईच्छुक खरेदीदारांचा प्रस्ताव न आल्यास त्यानंतर सदरची मिळकत सरफेसी कायदा कलम १३(५अ) नुसार विकत घेण्यासाठी बँक लिलावात सहभागी होऊ शकते.

**राखीव किमतीपेक्षा कमी किमतीच्या निवीदा स्वीकारल्या जाणार नाहीत.**

लिलावातील ईतर अटी व शर्ती बँकेच्या अधिकृत वेब साईटवर www.jjsbl.com पहाव्या.

**<u>सरफेसी कायदा ,२००२ अन्वये ३० दिवस मुदतीची लिलावपुर्व नोटीस</u>**

वरील कर्जदार/मिळकतदार यांना या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की,जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसांच्या आत कर्जाची संपुर्ण येणेबाकी रक्कम +व्याज+खर्च जमा करावी अन्यथा सरफेसी कायदा ,२००२ अंतर्गत बँक वरील मिळकतीची विक्री करुन कर्जाची वसुली करेल .

ठिकाणः-जळगाव
दि.०५/०२/२०२०

प्राधिकृत अधिकाऱ्यांची सही
जळगाव जनता सहकारी बँक लि. ,जळगाव

**<u>सरफेसी कायदा ,२००२ चे नियम ८(६) /९(१) अन्वये ३० दिवस मुदतीची लिलावपुर्व नोटीस</u>**

वर नमुद कर्जदार/मिळकतदार यांना या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की,सदर नोटीस हीच लिलावाची ३० दिवस मुदतीची सरफेसी कायदा ,२००२ चे नियम ८(६) /९(१) अन्वये दिली जाणारी ३० दिवस मुदतीची लिलावपुर्व नोटीस आहे याची नोंद घ्यावी.

टिपः-स्वैर अनुवाद मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकुर ग्राह्य मानावा.

# <u>लिलावातील अटी व शर्ती</u>

१) ज्या व्यक्तींनी निवीदा भरलेल्या आहेत त्या व्यक्तींनाच निवीदा उघडण्याच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येईल. सदरच्या निवीदा उघडल्यानंतरही ज्या व्यक्तींची निवीदा रकमेपेक्षा जास्त किमतीस सदरच्या मिळकती विकत घेण्याची ईच्छा असेल त्या व्यक्ती त्यांचा प्रस्ताव प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर ठेवू शकतात आणि हा प्रस्ताव आलेल्या निवीदांपेक्षा जास्त रकमेचा असेल तर हा प्रस्ताव विचारात घेतला जाईल.

२) ज्या व्यक्तीची निवीदा/प्रस्ताव मान्य केला जाईल त्यांनी इसाऱ्याची रक्कम धरुन विक्री किमतीच्या (मंजूर प्रस्तावाच्या)एकूण विक्री किमतीच्या २५ टक्के रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याकडे त्याच वेळी भरणे आवश्यक आहे तसेच उर्वरीत ७५ टक्के रक्कम सदरचा लिलाव कायम झाल्यापासून १५ दिवसाच्या आत जमा करण्यात यावी.

३) मिळकत खरेदी करणाऱ्या इसमाने जर मिळकतीची उर्वरीत ७५ टक्के रक्कम विहीत मुदतीत भरली नाही तर इसाऱ्यापोटी भरलेली २५ टक्के रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्राधीकृत अधिकारी यांना असेल.

४) आणि बँक सदरची मिळकत/मशिनरी पुन्हा लिलाव लावुन विक्री करणाचास मुक्त राहिल व निवीदा दाखल करणाऱ्या व्यक्तीचा मिळकतीवर/ईसाऱ्याच्या रकमेवर कुठलाही कायदेशिर हक्क/अधिकार राहणार नाही.

५) विक्री करारनामा/विक्री दाखला नोंदणीकृत करण्यासाठी लागणारा नोंदणीचा स्टँप,नोंदणी फी व इतर अनुषंगीक खर्च विकत घेणाऱ्याने करावयाचा आहे. तसेच सदर मिळकतीबाबत बाकी असलेले कोणतेही सरकारी ,निमसरकारी कर,अथवा देणी-घेणी विकत घेणाऱ्याने अदा करावयाची आहे त्याची जबाबदारी बँकेवर नाही.सदरची मिळकत नावावर वर्ग करण्याचा खर्च देखील विकत घेणाऱ्याने करावयाचा आहे.

६) प्राधिकृत अधिकारी केवळ विक्री दाखला देतील.या व्यतीरिक्त इतर अटी व शर्ती निवीदा उघडण्याच्या वेळी वाचण्यात येतील.अंतीम विक्री किंमत ठरवण्याचे अथवा कोणतेही कारण न देता निवीदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांनी राखुन ठेवलेले आहेत.आणि याबाबतीत त्यांचा निर्णय अंतीम राहील.

७) राखीव किमतीपेक्षा कमी किमतीच्या निवीदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

टिपः-स्वैर अनुवाद मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकुर ग्राह्य मानावा.